निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत ..
श्री.सुहास एकनाथ बोरुडे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/८२३१९३२/९०४/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ:- १. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि-२/आस्था/३४/२०२१ दिनांक ०१/०३/२०२१
२. इकडील दोषारोप पत्र क्र साप्रवि-१/आस्था-३/६३२/२०२१ दिनांक ०६/०९/२०२१
३. श्री सुहास बोरुडे, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक १६/०९/२०२१
४. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस जा. क्र.साप्रवि-१/आस्था-३/८५३/२०२१ दिनांक १२/१०/२०२१
५. श्री सुहास बोरुडे, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक २२/१०/२०२१
६. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/८२३१९३२/३९/२०२६ दिनांक २८/०१/२०२६
७. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/८२३१९३२/ ४०/२०२६ दिनांक २८/०१/२०२६
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/ आस्था१/७२/२०२६ समवेत श्री बोरुडे यांची पोहोच दिनांक ०२/०२/२०२६
९. श्री सुहास बोरुडे, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक ०९/०२/२०२६
१०. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)

श्री सुहास एकनाथ बोरुडे, हे कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कार्यालयीन कामी विनापरवानगी कार्यालय प्रमुख यांची पुर्वपरवानगी न घेता स्वत:च्या अधिकारात वेळोवेळी गैरहजर राहून गैरवर्तन केलेने श्री. बोरुडे यांना संदर्भ क्रमांक १ नुसार सेवा निलंबित करणेत आलेले होते.

संदर्भ क्रमांक २ नुसार श्री बोरुडे यांना दोषारोपपत्र १ ते ४ बजावणेत येऊ खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले. संदर्भ क्रमांक ३ नुसार श्री बोरुडे यांनी दोषारोपपत्राचा खुलासा सादर करुन त्यांचेवर ठेवणेत आलेले सर्व आरोप मान्य केलेने संदर्भ क्रमांक ४ नुसार कारण दाखवा नोटीस बजावणेत येऊन श्री बोरुडे यांची पुढील दोन वेतनवाढी कायमस्वरुपी थोपविणेची शिक्षा अंतिम का करु नये? या बाबत खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आले. संदर्भ क्रमांक ५ श्री बोरुडे यांनी खुलासा सादर केला. श्री बोरुडे यांनी कार्यालयीन कामी हलगर्जिपणा केलेचे सिध्द झालेने त्यांचा खुलासा अमान्य करणेत येऊन संदर्भ क्रमांक ६ च्या आदेशान्वये श्री बोरुडे यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षाकरीता थोपविणे अशी शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे.

श्री सुहास एकनाथ बोरुडे यांचा दिनांक ०२/०३/२०२१ ते दिनांक १३/१०/२०२१ अखेर एकुण २३६ दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती. संदर्भ क्रमांक ७ नुसार श्री. बोरुडे यांना नोटीस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्री. बोरुडे यांचा संदर्भ क्रमांक ८ नुसार खुलासा प्राप्त झालेला आहे. श्री.बोरुडे यांनी त्यांच्या खुलाशाचा सहानभुतीपुर्वक विचार करुन त्यांचा दिनांक ०२/०३/२०२१ ते दिनांक १३/१०/२०२१ अखेर एकुण २३६ दिवस निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी नियमित सेवा कालावधी म्हणुन ग्राह्य धरणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

श्री. बोरुडे यांना सदर प्रकरणी त्यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षाकरीता थोपविणेची शिक्षा करणेत आलेली असलेने त्यांचे निलंबन समर्थनीय ठरत आहे. त्यामुळे श्री. बोरुडे यांचा खुलासा अमान्य करणेत येत आहे. सबब, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ पोटनियम ७ च्या तरतुदीस अधिन राहुन श्री.सुहास एकनाथ बोरुडे, कनिष्ठ सहाय्यक, यांचा दिनांक ०२/०३/२०२१ ते दिनांक १३/१०/२०२१ अखेर एकुण २३६ दिवस सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.सुहास एकनाथ बोरुडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती जामखेड यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक .....20261104040205..... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:11:20

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.सुहास एकनाथ बोरुडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती जामखेड

द्वारा व प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती जामखेड

२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- निवडनस्ती.

स्वाक्षरी / ---
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर